# मी नाही केला त्या मनीचा खुन



कृष्णा राठोड यांच्या रहस्यमय कथा

# मी नाही केला त्या मनीचा खून

लेखक

**कृष्णा राठोड**

**(धुळे)**

# मी नाही केला त्या मनीचा खून

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मी नाही केला त्या मनीचा खून

## कृष्णा राठोड

**प्रकाशक**

**ई साहित्य प्रतिष्ठान**

**www. esahity. com**

**esahity@gmail. com**

**अक्षरजुळणी**

**कृष्णा राठोड**

**आवृत्ती :** पहिली

**WhatsApp Number**

**संपर्क-९६६५७५२४८१**

krathod787@gmail. com

# प्रस्तावना

खूप खुप आनंद होत आहे मला आज तुमच्याकडे
**“मी नाही केला त्या मनीचा खून”**

हे पुस्तक सादर करतांना व त्याचं सर्व श्रेय मी माझ्या आई, वडील, भाऊ, वाहिनी यांनाच देईन कारण त्यांनी जर मला वेळ दिला नसता तर मी आज तुम्हाला हे पुस्तक देऊच शकलो नसतो.

मित्रानो हे पुस्तक वाचल्यानंतर तुम्हाला काही अश्या क्षणाची आठवण येईल जे तुम्ही आता विसरलात. आपण या जीवनात पैशामागं धावता धावता माणुसकी सुद्धा विसरलो आहे. व एका अश्या विशीष्ट माणसाची कथा आहे जो पैश्यासाठी एका मांजरीचा खून करतो. पैशासाठी भूतदया विसरणारा या नराधमाला तुम्ही काय शिक्षा द्याल?, यांना समाजात जगू द्याल का?, माणुसकीचा गळा दाबणारा हा तरुण आहे तरी कोण? हे आपल्याला कळेलच. . . .

कृष्णा राठोड

# माझी ओळख (नवोदित लेखक)



नाव- समाधान निंबा राठोड
टोपणनाव- कृष्णा राठोड
शिक्षण- बी. ए. पास (इंग्लिश)
संस्था - श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे कला महाविद्यालय, देवपूर, धुळे
घरचा पत्ता- अवधान ता. जि. धुळे-४२४००६
मोबाईल नं-९६६५७५२४८१, 7875496807
इमेल पत्ता- krathod787@gmail. com
Blog - krushnarathod. wordpress. com

# मी नाही केला त्या मनीचा खून

लेखक – कृष्णा राठोड

# ओळख पात्रांची

| | |
|---|---|
| संजय देशपांडे | नायक |
| जगताप देशपांडे(रावसाहेब) | संजयचे वडील |
| सुनिता देशपांडे | संजयची आई |
| निकिता देशपांडे | संजयची बहिण |
| विमलाबाई देशपांडे | संजयची आजी |
| आर. के. मोरे | इन्स्पेक्टर |
| पांडूरंग पाटील | हवालदार |
| सुशांत मोहिते | रावसाहेबांचे शेजारी मिसेस मोहिते |
| मोहितेची मिसेस | |
| हेमंत शिंगाणकर | रावसाहेबांचे दुसरे शेजारी |
| मिसेस शिंगाणकर | शिंगाणकरांची मिसेस |
| राहुल शिंगाणकर | शिंगाणकरांचा मुलगा |
| मोहन | रावसाहेबांचा वाहनचालक |
| सुनंदा | मोहनची आई |
| स्त्री पहिली | कुलकर्णीची सून |

# सुरवात........

ती बरोबर सर्वांच्या मधोमध बसून रडत होती व कोणीही तिला सावरायला आले नाही. मी सुद्धा नाही कारण मोठ्यापुढे बोलायची आमच्या घरात संस्कृती नाही व परंपराही नाही.

ती स्वतःहूनच स्वतःला दोषी मानु लागली. घरात सगळेजण तिच्याकडे पाहत होते कारण ती काही चूक नसतानाही सर्व आरोप आपल्यावर घेत होती. सर्व घरच्यानाही माहिती होतं कि कमला असं करूच शकत नाही. पण आईच्या बोलण्यामुळे कमलाने तो दोष आपल्यावर घेतला होता. पण तरीही आई काहीही बोलत नव्हती. बोलणार तरी कशी? आईच्या सर्वात लाडकी मनीला ठार करण्यात आले होते. व सर्वाना माहिती होते कि कमला तसं करणार नाही. कारण मागच्या तीन वर्षांपासून ती अतिशय प्रामाणिकपणे काम करत होती व आईला देखील ते माहिती होतं.

पण मला विश्वास वाटत नव्हता कि आई का कमलावर हा आरोप लावत आहे. या सर्व गोष्टीना मी उलगडून सत्य काय आहे हे मी तुम्हास सांगणार आहे.

असो मी माझी ओळख करून देतोय मी संजय देशपांडे. माझ्या वडिलांचे नाव जगताप देशपांडे, पण त्यांना सर्वजण रावसाहेब म्हणून ओळखतात. माझं वय१८ वर्ष. माझ्या घरात माझी आई माझे बाबा माझी ताई व आजी हे आहेत. ही जी कथा आज आपण वाचत आहोत ती कथा कल्पित नसून वास्तविक आहे. व ही कथा माझ्याच घरात घडलेली आहे. व या कथनाला मी “मी नाही केला त्या मनीचा खून” हे नाव दिलयं, ही घटना काही वर्ष्याची नाही अहि महिन्याची नाही काही दिवसाची नाही तर अवघ्या अकरा तासापुर्वीची ही गोष्ट आहे. आणि  फ़क़्त दीड दिवसात संपलेली घटना आहे. कमाल आहे ना दीड दिवसात काय घडू शकतं ह्यावर तुम्ही विश्वासच नाही ठेवणार. असो मी तुम्हास सांगतोय कि ११ तासापूर्वी नेमकं ह्या घरात नक्की काय घडलंय.

सकाळचे ठीक ७ वाजून ३५ मिनिट झाले तरीही घरातील एकही सदस्य झोपेतून उठले नव्हते. आई सुद्धा नाही; आणि मी सुद्धा नाही. कारण सर्वांना सकाळी 6 वाजता उठवण्याचे काम मनी करत असते. ते सुद्धा प्रत्येकाच्या रुममध्ये जाऊन. व नेहमीप्रमाणे आज सुद्धा मनी आम्हाला उठवेल असं वाटल होतं.

मुळात मनी ही आमची मांजरीचे नाव. तिला आम्ही प्रेमाणे मनी म्हणतो. माझ्या आईने हे नाव ठेवले होते. आम्हाला सकाळी उठवण्यापासून तर आम्ही झोपल्यानंतर घरात पाळत ठेवणारी ती आमची मनीच. घरात एखादी कुत्रा, चोर, व्यक्ती कुणीही आले कि लगेच आवाज काढायची व आम्हाला कळायचं. पण आज तिचा आवाज नव्हताच.

मग सकाळी ७ वाजून ४० मिनिटांनी कमला आली व तिने पाहिले असावे कि घरात सर्वजण अजून झोपलेलेच आहेत. मग तिने आधी आईला उठवले व मग आईने आम्हा सर्वांना उठवले. बाबा जेव्हा आंघोळ करून आल तेव्हा बाबांनी कपाट उघडले व त्याचबरोबर ते घाबरलेही व आरडाओरड करू लागले. सर्वजण पळत-पळत बाबांच्या रुममध्ये आले व आईने विचारले कि काय झाले आरडओरड करायला? इतक्या जोराने आरडाओरड कश्याला करतायेत.

बाबा म्हणाले, ”अगं थांब आधी मला तर बोलु दे पूर्ण. तूच बोलतेयेस. माझं सुद्धा ऐक”.

आई म्हणाली , ”ठीक आहे बोला”.

बाबा म्हणाले “बोलू तरी काय तुमच्या डोळयाने पाहा इथे काय झालेय ते”.

व ते बघून आम्ही पार घाबरलोच कारण सर्वांना कळून चुकलं होतं कि चोरी झाली आहे ते.

कपाटात आईने बाबांकडे दिलेले दागिने, आजीच्या पेन्शनचे पैश्यानी बनवलेले दागिने, सर्व काही चोराने चोरून नेले होते. व घरात पहिल्या वेळेसच चोरी झाली होती. व म्हणून सगळेजण मनिला शोधू लागले. पण मनी काही कुणास दिसेना. तिकडे बाबांनी पोलिसांना फोन केला व झालेला प्रकार सांगितला. व ते सुद्धा मनिला शोधू लागले.

ताई आपले कपाट उघडून पाहू लागली कि आपलेही सामान तर चोरीला गेलं नाही ना. पण तिने दीर्घ श्वास घेतला. कारण तिचे कपाट व त्यामधील वस्तू सुरक्षित होत्या. व मग तीसुद्धा मनीस शोधण्यास निघाली.

जेव्हा सर्वजण वेगवेगळया ठिकाणी मनीचा शोध घेऊ लागले. तोच बागेमधून आजीचा ओरडण्याचा आवाज आला व सर्व जण बागेच्या दिशेने पळू लागले. व जेव्हा ते बागेत पोहोचले तेव्हा मी व माझ्या घरच्या सदस्यांनी जे पाहिले ते पाहून सर्वजण घाबरले. कमला सुद्धा होतीच तिथे, आणि जे पहिले ते पाहून मला अतिशय वाईट वाटले पण आई, बाबा आजी आणि ताई ह्या रडू लागल्या. कारण घरातील लाडक्या मनीचा चाकूने खून करण्यात आलेला होता.

सर्वजण एकमेकांना सावरु लागले. आणि रडणार ही का नाही मुलामुलींपेक्षा जास्त जिला घरचे सदस्य प्रेम करत होते. जिचं बालपण तरुणपण सुद्धा ह्याच घरात गेलं आणि तीच जर आपल्याला सोडून गेली, तर कोण आहे ज्याच्या डोळयातून अश्रू येणार नाही.

मी मात्र रडलो नाही. कारण मी लहानपणापासून तर बारावीपर्यंत बाहेरच शिकायालो होतो व त्या कारणामुळे मनीचे आणि माझे जास्त काही भेटणे वगैरे नसायचेच. पण दुख मात्र खूप होतं होतं. शेवटी त्या मुक्या जनावराने काय पाप केलं असावे जे तिला हे सर्व भोगावे लागले, तिने फ़क़्त एका मानवी परिवाराकडून प्रेम मिळवले होते व त्या प्रेमाचे फळ तिला असे भेटेल हे नव्हतं वाटलं. खूप वाईट वाटत होतं.

तितक्यातच पोलिसांची गाडी आलीच व त्या गाडीमधून माझ्या बाबाचे ओळखीचे इन्स्पेक्टर श्रीयुत आर. के. मोरे भेटले. व त्यांनी बाबांना विचारले, कि हे कसं काय घडलंय? कारण त्यांना सुद्धा माहिती होतं कि ह्या घरात मनीमुळे कधीही चोरी किंवा तसे काही आढळून सुद्धा आले नाही. ते बाबांना विचारायला लागले कि तुमचा कुणावर संशय वैगेरे आहे काय? जसं कि कुणी जवळचे नोकर वैगरे? किंवा कुणी बाहेरचे ओळखीचे?

पण बाबा म्हणाले “नाही! मला तर कुणावरच संशय नाही.”

तोच आई पोलिसांना म्हणायला लागली कि, “भाऊजी मला ह्या कमला वर संशय आहे कारण सर्वात अगोदर मला तिनेच उठवले. व सर्वजण झोपलेले होते पण ही मात्र घरात एकटीच असावी.”

पण बाबा म्हणाले, ”नाही कमला असं करूच शकत नाही कारण मागच्या तीन वर्ष्यापासून ती आमच्या इथे काम करते पण तसं काही आढळून आलं नाही”.

मग आई म्हणाली, ”मग ती काय तुम्हाला सांगून ते सर्व करणार आहे का?”

“अहो कश्याला आपापसात भांडतायेत आणि तुम्ही रावसाहेब तुम्ही शिकलेले आहात तुम्हाला माहिती असायला हवं कि ज्याच्यावर संशय येतो त्याच्यावर कारवाई करावीच लागते”, इन्स्पेक्टर म्हणाले.

बाबा म्हणाले, ”बरं ठीक आहे करून घ्या तपास. कळेल ली खरं काय आणि खोटं काय”.

इन्स्पेक्टर अंकल कमलाला आमच्यापेक्ष्या थोड्या दूर अंतरावर घेवून गेले व ते कमलाला विचारू लागले.

कमला म्हणाली, ”साहेब मी  च सांगत आहे कि मी सकाळी साडे सात वाजता इथे आली आणि बाईसाहेबाना उठवले”.

मी नाही केलाय त्या मांजरीचा खून आणि चोरी सुद्धा नाही, कमला म्हणाली.

मग तुझ्यावर का संशय येतोय यांना, इन्स्पेक्टर म्हणाले.

ते मला काही माहित नाही आणि साहेब मी जर चोरी केली असती तर इथे का परत आली असती, कमला म्हणाली.

“बरं ठीक आहे तू जेव्हा सकाळी आलीस तेव्हा तुला आजूबाजूला किंवा घरात काही नवीन आढळून आले का, जसे कि कुणी नवीन व्यक्ती, शेजारी असे”, इन्स्पेक्टर म्हणाले.

“नाही. तसं तर कुणीच नाही दिसलं”, कमला म्हणाली.

इन्स्पेक्टर अंकल परत आमच्याकडे आले व म्हणाले कि कमला नाही करू शकत चोरी, कुणी आणखीन आहे का संशयास्पद, इन्स्पेक्टर म्हणाले.

तोच ताई मध्ये ओरडत म्हणाली, ”अरे बाबा मोहन आला नाही अजून या वेळेस तर येतो ना तो”.

मी म्हणालो, ”मोहन माझ्या बाबांचा ड्रायवर खरंच त्याच्यावर कुणाचीच नजर नव्हती गेली रोज यावेळेस येतो तो मात्र आज आलाच नाही अजून”.

“बरं, मला सांगाल कि हा मोहन राहतो तरी कुठे? मला त्याच्या घरी जावं लागेल. रावसाहेब तुम्ही येता का माझ्याबरोबर? तुम्हास ठाऊक असेल मोहनच घर”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

“ठीक आहे चला आपण निघूया”

बाबानी पायामध्ये बूट घातले व इंस्पेक्टरच्या गाडीत बसून निघाले.

इन्स्पेक्टर अंकल बाबांशी बोलत सुद्धा होते, ”तसं किती वर्ष झालीत या मोहनला तुमच्याकडे”?.

“काही नाही आठ महिने झालेत आता व त्याच वागणंदेखील अतिशय वेगळं होतं”, बाबा म्हणाले.

“म्हणजे कसं नक्की?”, इन्स्पेक्टर म्हणाले.

“म्हणजे कुणाशी बोलायचा नाही, घराची काम सांगितली कि करायचा. पण घरात सुद्धा कधीच कुणाशी बोलायचा नाही”, बाबा म्हणाले.

“ठीक आहे, चला बघू तरी कसा काय केला याने हा डाव”, इन्स्पेक्टर म्हणाले.

“थांबा थांबा! हे काय आलंय मोहनच घर.”, बाबा म्हणाले

“गाडी थांबव कांबळे”, इन्स्पेक्टर हवालदाराला म्हणाला.

“चला रावसाहेब बघू तरी, ह्या मोहनला”, इन्स्पेक्टर म्हणाले.

तिघेही जण गाडीतून उतरले आणि मोहनच्या घराकडे निघाले. घर आतून बंद होते, बाबांनी दाराची कडी वाजवली.

आतून मोहनची आई आली, तिने बाबांना ओळखले. व म्हणाली “साहेब तुम्ही या ना आत या”.

“मावशी, मोहन कुठे आहे? तो आज आला का नाही कामाला?”, बाबा म्हणाले.

“साहेब तो तर कालच्याला गावाकडे निघाला माझ्या सुनेला घ्यायला”, मोहनची आई म्हणाली.

“खरं सांगा! सुनेला घ्यायला गेलाय कि पळाला इथून?”, इन्स्पेक्टर जोरकस आवाजात म्हणाला.

ती घाबरली आणि म्हणाली “नाही! तो खरंच काल संध्याकाळपासून गावाला गेलाय. त्याच्या बायकोला घायला. आणि तो कश्याला पळेन? साहेब काही केलंय का त्याने? बोला ना साहेब”, मोहनची आई म्हणाली.

“चोरी आणि खून केलाय त्याने”, बाबा म्हणाले.

“खून? आणि चोरी? कुणाचा? कुठे? साहेब सांगा ना”, मोहनची आई म्हणाली.

“यांच्या घरातून चोरी केली आणि यांच्या मांजरीचा खून केलायं मोहनने”, इन्स्पेक्टर म्हणाला.

“नाही साहेब माझा मुलगा चोरी आणि खून नाही करू शकत आणि मुक्या जनावरांचा तर मुळीच नाही. तुम्हाला नक्की काही तरी गैरसमज झाला आहे साहेब”, मोहनची आई म्हणाला.

“काही गैरसमज झाला नाही! आधी हे सांगा कि त्याची सासरवाडी आहे तरी कुठे?”, इन्स्पेक्टर म्हणाला.

“नाही साहेब त्याला तर मुक्या जनावरांना खूप लळा आहे, तो कसा काय मांजरीचा खून करू शकतो?” मोहनची आई म्हणाली.

“ते सोडा, ते आम्ही पाहतो. तुम्ही फक्त त्याच्या पत्ता सांगा?”, इन्स्पेक्टर म्हणाला.

इथून जवळच आहे त्याची सासरवाडी शेमट्या गावात, मोहनची आई म्हणाली.

“बरंय! येतो आम्ही. घरी आल्यास ताबडतोब कळवा”, इन्स्पेक्टर म्हणाला.

“ठीक आहे साहेब”, असे म्हणत मोहनची आई सुनंदा तिथेच बसून डोक्याला हाथ लावून रडू लागली.

“चला रावसाहेब! निघूया. शेमट्याला चल रे हवालदार”, इन्स्पेक्टर म्हणाला.

तिघेही जण गाडीमध्ये बसून शेमट्याकडे रवाना झाले.

इकडे घरात मी आणि ताई बाबांच्या खोलीमध्ये जाऊन बघायला लागलो कि काही तरी पुरावा मिळेल.

ताई अर्धा भाग शोधत होती तर मी अर्धा. सर्वांना चोरी झालेल्या वस्तूंची अजिबात चिंता नव्हती , त्यांना फ़क़्त चिंता होती तर फ़क़्त मनीची. मला तर समजत नव्हत या मुक्या जनावराने पूर्ण घरच्या लोकांना कसे काय आपल्या ताब्यात घेतलं असेल. असो मला सुद्धा होती थोडीसी चिंता मनीबद्दल पण आता करणार तरी काय ए व्हायचे होतं ते झालेच.

मला अचानक ताईचा आवाज आला मी ताईकडे धावलो, लगेच ताईने मला दरवाजाचा फाटलेला पडदा व बाबांचाफाटलेला सदरा दाखविला कि “याचा फाटलेला भाग इथे नाही नक्की तो चोराकडे असायला पाहिजे कळतनकळत त्याने तो फाडला असावा व तो फाटलेला कापड त्याच्याकडे असावा या पडद्याचा अर्धा भाग ज्याच्याकडे असेन तो मनीचा खुनी असेन”, ताई म्हणाली.

“बरं! ठीक आहे. आणखीन दुसरं काही तरी बघ मिळेन पुरावा”, ताई म्हणाली.

“तूच का नाही बघत ताई तसंही माझ्यापेक्ष्या जास्त तू इथे राहिलेली आहेस कि नाही”, मी म्हणालो.

“बरं ठीक आहे तू काही त्रास नको करून घेवू डोक्याला. मी बघेन. ठीक आहे”, ताई म्हणाली.

पण मी ताईच्या गोष्टीला दुर्लक्षित करत एखादा तपास करणारा अधिकारी जसा तपास करितो तसा मीही खोलीमध्ये फिरू लागलो, व ताई परत काही तरी शोधण्यात गर्क होती.

आम्ही दोघं भाऊ बहिण पुराव्याच्या शोधात होतो.

“तोच तिकडून आईचा आवाज आला, मुलानो चला चहा पिऊन घ्या बरे”.

तोच ताई परत परत त्या दरवाज्यावर बसवलेला फटका पडदा पाहू लागली.

मी म्हणालो, ”ताई आधी चल नंतर बघू काय आहे ते”, ताई बाहेर निघत म्हणाली.

मी सुद्धा बाहेर येत विचार करीत होतो.

इकडे इन्स्पेक्टर अंकल, हवालदार आणि माझे बाबा शेमट्याला पोहोचले. व तपास करायला लागले.

माझे बाबा मोहनचा फोटो खिशामधून काढून इन्स्पेक्टर मोरेला दिला.

इन्स्पेक्टर अंकल तो फोटो व मोहनचा नाव सर्वांना दाखवत व विचारात होता.

बाबांनी एका तरुण व्यक्तीला बोलावलं व विचारलं परळीच्या मोहनची सासरवाडी इथेच का?, बाबा म्हणाले.

“कोणता मोहन? फोटो वैगरे असेल ना तुमच्याकडे”, तो तरुण म्हणाला.

“मोरेसाहेब तो फोटो दाखवा थोडं याला”.

व इन्स्पेक्टर अंकल तो फोटो त्या तरुणाला दाखवत म्हणाला, ”हा बघ नीट बघ व नीट सांग चोरी करून एका मांजरीचा खून केलाय त्याने”.

“हो! हो! ओळखतो मी याला. पण साहेब हा चोरी नाही करून शकत, खूप चांगला माणूस आहे. या गावात कुणालाही विचार. तो सांगेन कि मोहन कसा आहे ते”, तो तरूण म्हणाला.

“तू ते सोड आधी हे सांग हा राहतो तरी कुठे?”, इन्स्पेक्टर म्हणाला.

“हा आला होता साहेब पण बायकोला घेवून गेला परत घरी”, तो तरुण म्हणाला.

“च्याआयला रावसाहेब! हा मोहन तर खूप फिरवतोय. नक्की यानेच खून केला असावा”, इन्स्पेक्टर अंकल बाबांना बोलले.

“वाटत तर नाही. पण आता तुम्ही सांगतायेत तर खरं असेल बहुतेक”, बाबा म्हणाले .

“मग आता परत कुठे फिरवू साहेब गाडी स्टेशन ला कि रावसाहेबाच्या घरी कि मोहनचा घरी”, हवालदार म्हणाला.

“अं अं आता एक काम कर चल परत घरी”, इन्स्पेक्टर म्हणाला.

व तिघेही गाडीत बसून घराकडे निघाले.

इकडे चहा पिल्यानंतर मी व ताई परत बाबांच्या खोलीमध्ये जाऊन तो सदरा पाहू लागलो. व तो निरखून पाहिल्यावर कळल कि चोराने याच्यातून काही तरी काढल असावं

तोच बाबा व इन्स्पेक्टर अंकल बाबांच्या खोलीमध्ये आले. मी बाबांना म्हणालो, ''बाबा या सदर्र्यात काही ठेवलं होतं का तुम्ही बघा ह्या चा फाटलेला भाग".

तो भाग ब सदरा मी इन्स्पेक्टर अंकलना दिला. ते पाहत होते.

"अरे! याच्यात कपाटाची चाबी होती. त्याच्या शिवाय कुलूप उघडणे अशक्यच", बाबा म्हणाले.

"मग चोराने सदरा न फाडता ही काढला असता" , इन्स्पेक्टर म्हणाला.

"मोरेसाहेब हा सदरा अर्धा माझ्या डोक्याखाली होता. त्यामुळे तो त्याने जोर ओढतांना फाडला असावा", बाबा म्हणाले.

"मग तोपर्यंत तम्ही काय करत होते रावसाहेब?", इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

ताई तो पर्यंत खोलीमध्ये फिरतच होती. व आणखीन काही तरी सापडेन या आशेवर पलंगाखाली, कपाटाखाली, दरवाजाच्या आड असे सर्व कोपरे ती निरखून पाहत होती. मला वाटतं हे पूर्ण ती फ़क़्त मनीमुळेच करत होती. कारण मनीचा खून कोणत्या निर्दायाने केली असेल हेच तिला पाहायचं होतं. बाकि पैसे आणि दागदागिने याच्यात तर कुणाचीच आवड नव्हती. आजी आई निराश होऊन त्या दोघीही आईच्या खोलीमध्ये बसलेल्या होत्या. घरात आजी मेली असती तर मी

रडलो असतो व समजल ही असतं कि आपल्या घरात सर्व लोक उदास का आहेत. पण इथे तर चक्क एका मुक्या जनावामुळे पूर्ण घर दुखाच्या सागरात बुडालेलं होतं. आई बाबा ताई आजी आणि तेच इन्स्पेक्टर अंकल पण कारण एका मांजरीचा खुनाचा सुगाव्यासाठी इन्स्पेक्टर अंकल फिर फिर फिरत होते. त्यांच्या या कार्याला मी खरंचं वंदन करू इच्छितो.

इन्स्पेक्टर अंकल , व आम्ही सर्व जण बाबांच्या खोलीत होतो आजीने आईस सर्वांसाठी चहा आणायला सांगितला व आई गेली व सर्वांसाठी चहा आणली. मी, बाबा, इन्स्पेक्टर अंकल, हवालदार साहेब आम्ही सर्व चहा पीत होतो मात्र एक व्यक्ती फ़क़्त काही ना काही शोधतच होती.

बाबा म्हणाले, ”लई लळा लावलीय या मनीने बघ आमच्या सोनीला कशी जीव टाकतेय मोरेसाहेब”.

“होय रावसाहेब दिसलंय तुमच्या घरातन काहीतरी शिकल्यासारखं वाटतंय. मुक्या प्राण्यांना प्रेम करणं कुणी ह्या परीवारीकडून शिकावं. तुम्ही काही त्रास नका घेवू मी खऱ्या गुन्हेगाराला नक्कीच अटक करीन.”

“बेटा सोनी तू आधी चहा पिऊन घे बरं का”, इन्स्पेक्टर म्हणाले.

तोच ताईला खिडकीच्या बाहेरच्या बाजूला एक इंजेक्शन सापडला. आणि एक औषधांची बाटली सापडली/ ताईने ती बाटली पहिली आणि तिच्यावरच नाव वाचून बोलू लागली.

“हि बाटली पेशंटला बेशुद्ध करण्यासाठी वापरली जाते” , ताई म्हणाली.

माझी ताई बी फार्म करतेय हे मी सांगितलंच नाही.

इन्स्पेक्टर अंकल ती बाटली हातात घेत म्हणाले. “पण ही इथे आली तरी कशी असावी”.

साहेब हे तर तो मोहनच सांगू शकतो, हवालदार म्हणाला.

इन्स्पेक्टर अंकल डोक्याला हात लावून विचार करीत होते.

“समजल, त्या चोराने कारस्थान करून ही चोरी केली. त्याला आधीच माहिती होतं कि चावी वैगेरे कुठे असते . त्याने हे औषध नककीच रावसाहेबावर वापरले असावे. व जेव्हा रावसाहेब ह्या औषधाच्या अधीन झाले. तेव्हा चोराने जोरात रावसाहेबांचा सदरा ओढला व याचा आवाज त्यांना आला नाही कारण ते शुद्धीवर नव्हतेच. व चोर सर्व चोरी करून बागेच्या दिशेने जात असेल पण मनीने चोराला पाहिलं असावं व ही मनी ओरडेल त्या आधीच त्या चोराने मनीचा धारदार चाकूने वार केला असावा. पण इथे प्रश्न असा आहे कि तो नक्की आहे तरी कोण?”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

“मोहनच सांगेन आता खरं काय आणि खोटं काय ते”, ताई म्हणाली.

“तर मग बरं रावसाहेब चला आपण निघूया”, इन्स्पेक्टर म्हणाले.

“कुठे?, बाबा म्हणाले.

“काय कुठे रावसाहेब! मोहनच्या घरी”, इन्स्पेक्टर म्हणाला.

मग हवालदार, बाबा, व इन्स्पेक्टर अंकल परत परळीकडे निघाले मोहनच्या गावाला. आई आजी आणि ताई ह्या खूप दुख करत होते. ताई उठली व जिथे मनीला मारून फेकलेले होते तिथे जाऊन मनीच्या मेलेल्या शरीराकडे एकटक

पाहू लागली. तिला पाहून ताई नक्कीच जुन्या आठवणीच्या डोहात गेली असेल , आणि जाणार का नाही मनी होतीच तशी, अधूनमधून मी सुद्धा जेव्हा उन्हाळयाच्या सुट्यांमध्ये घरी यायचो तेव्हा मनी मला गाणे म्हणून दाखवीत असे. व मनीमुळे आमच्या घरात सुरक्षितता होती. कुणी चोर, उंदीर, कुणीचीच घरात शिरण्याची हिम्मत व्हायची नाही. तुम्हाला जर मी मनीची काही गमतीची उदाहरणे सांगितली तर तुम्ही सुद्धा मनीचे चाहते व्हाल कारण ती तशी होती सुद्धा. आतिशय जाड व दिसायला भुऱ्या रंगाची मनी तिचे ते भुऱ्या रंगाचे केस, भुरे कान, हात, पाय पूर्ण शरीर भरभरून दिसायचे तिचे. जर आज ती कुणाकडेही असली असती तर कदाचित तुम्ही तिला कधीच दूर नाही होऊ देणार नाही.

इकडे माझे बाबा, इन्स्पेक्टर अंकल व हवालदार तिघेही परत परळीला पोहोचले. इन्स्पेक्टर बाबांना म्हणाला “जर का आपण गेलो तर कदाचित तो दार उघडणार नाही, माझ्याकडे एक सापळा आहे आपण इथल्या एख्याद्या स्त्रीला दार उघडायला सांगू, म्हणजे त्यांना वाटेल कि आपल्याच गावाची कुणीतरी असेन. हवालदार एक काम करा त्या झाडाखाली उभ्या असलेल्या स्त्रीला बोलवा इकडे”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाला.

हवालदार गेला नी त्या स्त्रीला बोलावून आणलं,

ती स्त्री घाबरली होती, व घाबरत घाबरत म्हणाली “साहेब काय झालं”.

“घाबरू नकोस तू काही नाही केलंय पण आम्हाला तुझी मदत हवीय”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाला.

“माझी मदत? ती का बरं?”, ती स्त्री म्हणाली.

“तुला फ़क़्त ह्या घरात जाऊन मोहनच्या आईला घर उघडायला लावायचं आणि कृपया करून आम्ही आहोत असे सांगू नका”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाला.

ठीक आहे साहेब, असे म्हणत ती स्त्री मोहनच्या घरी गेली आणि हाक मारू लागली, ”मोहनच्या आई आहेत का घरात”?

आतून मोहनची आई, ”कोण आहे बाहेर”.

मी कुलकर्णीची धाकटी सून दरवाजा उघडावा कि, ती स्त्री म्हणाली.

ठीक आहे येतं जरा थांब.

मोहन घरात आहे हे मोहानच्या आईला ठाऊक होतं, पण करणार तरी काय ती तर कुलकर्णीची सून असेल म्हणून दरवाजा उघडत होती

आणि जसा मोहनच्या आईने दरवाजा उघडला तसा इन्स्पेक्टर अंकल आणि माझे बाबा आणि हवालदार तिघेही मोहनच्या आईला बाजूला सारत आत घुसले, त्यांनी मोहनला पळायला संधीच दिली नाही. व हवालदाराने ताबडतोब मोहनला पकडले.

मोहनच्या डोक्यात काहीच न घुसण्यासारखं मोहन वागत होता. जणू तो या सर्व गोष्टींपासून अज्ञान आहे असे वाटत होते.

“मोहन तू असे का केले पैसे लागत होते तर मागितले असते, अशी चोरी करण्याची काहीच गरज नव्हती, आणि पैश्यासाठी तू एका मुक्या प्राण्याला देखील मारलेस”, बाबा म्हणाले.

“साहेब पण मी केलं तरी काय? मी कुणाचाच खून नाही केला साहेब.”, मोहन म्हणाला.

“सर्व चोर असेच म्हणतात”, हवालदार म्हणाला.

“पण साहेब मी खरंचं काहीच केलेले नाही, माझ्यावर विश्वास ठेवा साहेब”, मोहन म्हणाला.

“साहेब मी सांगितलं ना माझा मोहन असं करू शकत नाही”, मोहनाची आई म्हणाली.

“मग तू आला का नाही कामावर”, बाबा म्हणाले.

“साहेब मी माझ्या बायकोला घ्यायला गेलो होतो, तुम्ही विचारा ना माझ्या बायकोला”, मोहन म्हणाला.

“होय साहेब, हे मलाच घ्यायला आले होते माझ्या माहेरला”, मोहनची बायको म्हणाली.

“साहेब तुम्ही गावात कुणालाही ही विचारून घ्या, मी खरंचं तिथेच होतो”, मोहन म्हणाला.

“आणि साहेब मला जर पैसे लागले तर मी मागतो तो ना तुमच्याकडे मग मी चोरी कशाला करेन”, मोहन बाबांना म्हणाला.

“आता काय म्हणता रावसाहेब”, इन्स्पेक्टर म्हणाला.

“मी तर सांगितले होते मोहन तसा नाही आहे”, बाबा म्हणाले.

“पण झालं तरी काय”, मोहन म्हणाला.

“अरे खून झाला मनीचा आणि घरात चोरी सुद्धा झाली आहे”. बाबा म्हणाले.

“काय? मनीचा खून झाला? कोण असेल ओ शैतान ज्याने त्या मुक्या जनावराला मारलं असेल?” मोहन म्हणाला.

इन्स्पेक्टर डोक्याला हाथ लावत बाबांना विचारात आहे, आता तर फ़क़्त एक जण बाकी आहे.

“कोण?”, बाबा म्हणाले.

“तुमचे शेजारी”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

“ते तर खूप सभ्य गृहस्य आहेत, आताच तर आलेत ते कॉलोनीत मला नाही वाटतं त्यांनी हे सारं केलं असेल म्हणून”, बाबा म्हणाले.

“आम्ही पोलीस आहोत रावसाहेब आम्हाला प्रत्येकावर संशय घ्यावा लागतो”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

“हवालदार काढ गाडी”,

“सॉरी मोहन आमच्यामुळे तुला त्रास झाला”, इन्स्पेक्टर म्हणाला.

असे म्हणून तिघेही म्हणजेच बाबा, हवालदार व इन्स्पेक्टर अंकल गाडीत बसले व परत घराकडे येण्यास निघाले.

इकडे घरी आम्ही पूर्ण उदास बसलो होतो. सर्वजण फ़क़्त जे आमच्या घरात कामाला आहेत त्यांच्यावरच संशय घेत होतो, पण शेजाऱ्यावर संशय घेतलाच नाही. आमच्या घराच्या उजव्या बाजूला शिंगाणकर परिवार तर डाव्या बाजूला मोहिते परिवार राहत होते. तसे मोहिते परिवार आणि शिंगाणकर परिवार हे दोघं आताच २ महिन्यापूर्वी इथे राहायला आले होते. शिंगाणकर परिवार तर कधी कधी आमच्या घरी यायचे पण मात्र बोलायचे कमी आणि घराकडे पाहायचे जास्त, त्याच्या या वागण्यामुळे आम्ही सर्वजन त्रासलो होतो. पण मोहिते परिवार हा खूप हसरा स्वभावाचे होते, ते सुद्धा यायचे घरात आईशी, बाबांशी व बाकी सर्वांशी ते बोलायचे. त्यांच्याबद्दल आम्हास काही एक तक्रार नव्हती. . . . .

पूर्ण जण बसलेलो असतानांच पोलिसाची गाडी आली आणि ते शिंगाणकर परिवाराच्या घरी गेले.

दरवाजा उघडा होता पण तरीही इन्स्पेक्टर अंकल यांनी बेल बाजवली.

व आतून त्यांचा ९ वर्षाचा मुलगा राहुल बाहेर आला.

इन्स्पेक्टर अंकल म्हणाले, ”तुझे बाबा कुठे आहेत बोलव त्यांना”.

“आई हे बघ शेजारचे अंकल आणि पोलीस अंकल आलेत ये बाहेर”, शिंगाणकरचा मुलगा त्याचा आईला म्हणाला.

व राहुलची आई कपाळावरचे घाम पदराने पुसत बाहेर आली बहुतेक ती काही तरी करत असावी.

“भाऊजी तुम्ही आणि सोबत पोलीस सुद्धा काय झालं चोरी बिरी झाली कि काय?”, मिसेस शिंगाणकर बाबास म्हणाल्या.

“तुम्हीच मिसेस शिंगाणकर का?”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

“हो मीच मिसेस शिंगाणकर. काय झालाय साहेब?”, मिसेस शिंगाणकर म्हणाल्या.

“तुमच्या शेजारी चोरी आणि खून झालाय आणि तुम्हाला ठाऊकच नाही, याचा अर्थ काय?”, इन्स्पेक्टर अंकलम्हणाले.

“अहो साहेब याचा अर्थ म्हणजे आम्ही केलाय का तो खून आणि चोरी, असच म्हणायचंय ना तुम्हाला?”, मिसेस शिंगाणकर म्हणाल्या.

“नाही! आम्हाला तर तसं सर्वांना म्हणावं लागतं, पोलीस आहोत ना”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

“बरं! ठीक आहे. सांगा तुमचे मिस्टर कुठे गेलेत?, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

“ते बाहेर गेलेत थोड्या वेळानंतर येतील”, मिसेस शिंगाणकर म्हणाल्या.

“बरं! आल्यावर राहुल रावसाहेबांच्या घरी पाठवा कळवण्यासाठी”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

“बरं! ठीक आहे.”, मिसेस शिंगाणकर म्हणाले.

“येतो आम्ही चला रावसाहेब मोहितेच्या घरी”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

“अहो मोरे साहेब एक काम करा आधी आपण घरी जाऊन चहा घेऊ मग जाऊ”, बाबा म्हणाले.

“असं म्हणताय का? चला तर मग”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

तिघेही जण परत घरी येतात बाबा कमलाला सांगतात, ”कमला चहा तरी ठेव जा”.

होय आणते साहेब, कमला म्हणाली.

कमला आत जाते आणि चहा बनवून आणते. व जिथे बाबा व अंकल बसलेले असतात त्या टेबलावर जाऊन त्यांना चहा देते.

“काहो लागला का काही तपास?”, आई बाबास म्हणाली.

“नाही मोहनला सुद्धा विचारला पण तो सुद्धा नाही आत्ताच शिंगाणकरांच्या घरातून आलोय. ते सुद्धा बाहेर गेलेत. येतील आत्ता. मोहितेच्या घरी जाऊन तपास करून येतो”, बाबा म्हणाले.

“छे छे मोहिते भाऊजी असं करणार आहेत का?”, आई म्हणाली.

“मला तर नाही वाटत.  पण मोरे साहेबाना संशय आहे त्यांच्यावर. म्हणून तपास केलाच पाहिजे”, बाबा म्हणाले.

“वहिनी तसं काय आहे ना, आम्हाला प्रत्येकावर संशय घ्यावा लागतो. तसं तुमच्या सांगण्यानुसार कमळावर ही घ्यावाच लागलं ना?”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

“काहीच मिळणार नाही. या तपास करून”, आई म्हणाली.

चहा पिऊन झाल्यावर परत ते उभे राहिले व मोहितेच्या घरी जाण्यास निघाले. मी सुद्धा हट्ट केला त्यांच्याबरोबर जाण्यासाठी व आई ने मला थांबवले सुद्धा पण इन्स्पेक्टर अंकल म्हणाले. येऊ द्या त्या पोराला बघेल आणि शिकेल काहीतरी आमच्याकडून, चल ये संजय चल, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले. व आम्ही चौघेजण निघालो मोहितेच्या घरी.

मोहिते अंकालांच घर आतून बंद होतं वाटतं होतं सर्वजण घरात च आहेत कारण तसा आवाज ही येत होतं आतून आम्ही दरवाजाची बेल वाजवली.

आतून एका स्त्रीची आवाज आली, ”कोण आहे बाहेर”.

“पोलीस”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

घरात मिसेस मोहिते, म्हणाली, “पोलीस? इथे कशी काय?”.

मोहिते अंकल येतात आणि दार उघडतात. व विचारतात, ”काय झालं साहेब आपण इकडे कसा काय”.

आमच्या मनीचा खून झालाय आणि घरात चोरी सुद्धा झालीय, बाबा म्हणाले.

काय म्हणताय रावसाहेब, मोहिते अंकल म्हणाले.

होय जे खरंय तेच बोलतोय, बाबा म्हणाले.

केव्हा घडलं हे सारे रावसाहेब, मोहिते अंकल म्हणाले.

रात्री मोहिते, बाबा म्हणाले.

अरे खूप वाईट घडलं, मोहिते अंकल म्हणाले.

ते सोडा तुम्ही रात्री कुठं गेला व्हतात तुम्ही, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

काय साहेब रात्री लोक कुठं जाणार आहेत, मोहिते अंकल म्हणाले.

मस्करी करताय काय, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

नाही साहेब मस्करी नाही करत झोपलो होतो मी रात्री, मोहिते अंकल म्हणाले.

तुमचा येण्याचा रस्ता कोणता, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

रावसाहेबांचा घरासमोरुनच आहे माझा येण्याचा रस्ता, मोहिते अंकल म्हणाले.

आणि मग तुमच्या शेजारी खून आणि चोरी झाली आहे तरी तुम्हाला ठाऊक नाही, मोहिते अंकल म्हणाले.

“अहो साहेब माहिती होतं” हे बोलल्यानंतर मोहिते अंकल स्वताच, तोंड सांभाळू लागला असं वाटत होतं त्याला बोलायाच नव्हतं तरी नकळत ते बोलंलं गेलं असं वाटतं होतं.

“काय? माहिती होतं तरी तुम्ही पाहायला आलात नाही, आणि जर का माहिती होतं तर मग आम्ही विचारल्यावर न माहिती असल्यासारखे का उत्तर देत होतात? रावसाहेबांशी ही तसंच वागलात”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

“नाही हो साहेब ते थोडेसे घाबरलेले आहेत”, मिसेस मोहिते बोलल्या.

“घाबरलेले!, का?”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

“आज पाहिल्यावेळेस पोलीस आलेत न आमच्या घरी म्हणून”, मिसेस मोहिते म्हणाल्या.

“हो हो साहेब म्हणूनच घाबरतोय मी, आज पाहिल्यावेळेस आलेत न पोलीस माझ्या घरी”, मोहिते अंकल म्हणाला.

“मी माझा तपास चालू ठेवला होता म्हणजे मी काही सापडतं का त्या शोधात होतं, पण काही मिळेना”.

“मग ठीक आहे, एक काम करा उद्या या पोलीस स्टेशनला. येतो आम्ही”, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

“बरं साहेब. येतो उद्या”, मोहिते अंकल म्हणाले.

शेवटी मग हवालदार, माझे बाबा व इन्स्पेक्टर अंकल जेव्हा जायला निघाले तेव्हा मी सुद्धा पलटलो घरी जाण्यासाठी व मोहिते परिवार सुद्धा दार लावून लगेच आत गेले. बाबा, हवालदार आणि इन्स्पेक्टर अंकल गाडीत बसले. मी मात्र मागेच होतो हळूहळू येत होतो काहीतरी सापडेल या आशेने, व ती आशा पूर्ण देखील झाली होती. मला सदऱ्याचा फाटलेला तुकडा तिथे सापडला. मी तो उचलला आणि मोहिते परिवाराच्या दरवाज्याकडे वळलो. व ऐकले कि आज रात्री ते कुठेतरी जाण्याचा बेत आखत होते. मी तिथून लगेच निघालो. इन्स्पेक्टर अंकल यांनी मला पहिले, मी गेलो व सारं सत्यही त्यांना सांगितलं .

आता सर्वांना कळून चुकलं होतं कि मोहिते परिवारच खुनी आणी चोर आहे. घरी आल्यावर इन्स्पेक्टर अंकल यांनी सर्वांना ही घटना सांगितली. व शेवटी मग इन्स्पेक्टर अंकलांनी एक सापळा आखला, मोहिते परिवाराविरुद्ध. तो सापळा असा होता आज रात्री मोहिते परिवार कुठे जात आहे त्यांचा पाठलाग करून सुगावा मिळवायचा. व मग आम्ही सर्वजण जेवण केलं. मग आई, ताई व आजी या घरी राहतील असे ठरले. व मी, इन्स्पेक्टर अंकल, बाबा व हवालदार आम्ही चौघेजण रात्री पुरावा मिळवण्यासाठी मोहिते परिवाराच्या पाठलाग करणार अशी योजना बनविण्यात आली. खून आणि चोरी ही मोहिते परिवाराने केलंय असं सर्वांना माहिती पडल होतं, आणि त्याचा कच्चा पुरावा देखील होता. पण तो पुरावा पुरेसा नव्हता. आम्ही निघालो होतो मनीचा खून करणाऱ्यांना पकडण्यासाठी त्यांचा मागोमाग, पण जसं ठरलं होतं तसं नाही घडल. मोहिते परिवार एका लग्नासाठी आले होते कारण घरातून निघाण्यापासून तर लग्नाच्या मंडपापर्यंत आम्ही त्यांचा पाठलाग केला पण व्यर्थ. मोहिते परिवार त्यांच्या एका मित्राच्या जन्मदिनाच्या

निम्मित सरप्राइस देण्यासाठी त्याला नं सांगता गेले होते व कदाचित जे मी त्यांच्या घरात ऐकलं ते बहुतेक याच्याबद्दलच बोलत असतील. आम्हा सर्वांना कळून चुकलं कि आम्ही एका निष्पाप परिवारावर आरोप करत होतो. पण मी इन्स्पेक्टर अंकल यांना बोललो, "मग अंकल हा कापड त्यांचा घरी गेला तरी कसा असावा"?.

बेटा हे तर तोच सांगू शकेन ज्याने हे सर्व डाव टाकलेत, तोपर्यंत चला आपण निघूया. आम्ही सर्वजण तिकडून फिरून येतच होतो कि बाबांना एका गोल्डशॉप च्या बाहेर शिंगाणकर परिवार दिसला. मोहिते अंकल वर संशयामुळे आम्ही त्यांना विसरलोच होतो. शिंगाणकरांना संध्याकाळी इन्स्पेक्टर अंकल यांनी भेटायला बोलावलंय होतं तरी ते आले नाहीत यावर देखील कुणी लक्ष नाही दिलं. असो आता सत्य काय ते आमच्यासमोर येणार होते. आम्ही बाहेरच उभे होतो शिंगाणकर परिवार जेव्हा घरी जाईल तेव्हा आम्ही आत जाऊ असा बेत होता.

थोड्या वेळानंतर शिंगाणकर परिवार बाहेर आलं व गाडीत बसून निघून गेलं.

आम्ही लगेच त्या सोन्याच्या दुकानामधी गेलो व तपास सुरु केला. शोपेकीपर सत्य काय आहे ते सांगण्यास तयार नव्हता.

खरं सांग जे आता आले होते ते कश्यासाठी आले होते, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

साहेब खरं सांगतो, ते सोने घेण्यासाठी आले होते, दुकानदार म्हणाला.

असं होय म्हणजे तू खरं सांगणार नाही, हवालदार गाडीतून बंदूक घेवून आणा, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

साहेब परवाना वाली आणू कि विना परवाना वाली, हवालदार म्हणालो.

नाही नाही साहेब सांगतो, सर्व सांगतो, दुकानदार म्हणाला.

हा आता आलास न उठनीवर, बोल. इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

साहेब ते सोने विकायला आले होते. त्यांच्याकडे बिल पण नव्हतं साहेब, मला वाटतंय चोरी करून आणले होते दागिने, दुकानदार म्हणाला.

तू घेतलेस का?, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

होय साहेब मी ते कमी किमतीत घेतले, माफ करा साहेब मला , दुकानदार म्हणाला.

लाज नाही वाटत चोरीची वस्तू विकत घ्यायला, बरं ठीक आहे दाखव ते दागिने, इन्स्पेक्टर अंकल म्हणाले.

दुकानदाराने ते सर्व दागिने बाहेर काढले, व बाबांनी ते दागिने पहिले, व ओळखले सुद्धा ते सर्व दागिने आमचेच होते. आता सर्वांना कळून चुकलं होतं कि शिंगाणकर परिवारच चोर आणि खुनी आहे. बाबांनी ते दागिने घेतले आणि आम्ही परत शिंगाणकरांच्या घरी गेलो.

सर्वजण जागेच होते. हवालदारांनी शिंगाणकरांना ताबडतोब अटक केली. व पूर्ण उलगडा विचारला पोलिसांच्या मारण्यामुळे शिंगाणकराणे पूर्ण सत्य सांगितले. कि कसा तो रात्री २. २० वाजून ४५ मिनिटांनी घराकडे येत होता. व त्याची नजर आधीपासूनच त्या सोन्यावरच होती त्याच्या बाईने ते काम केलं होतं कि कुठे सोने वैगेरे ठेवले, मग कसा त्याचा घाईगडबडीत दरवाजाचा पडद्याचा फाटलेला कापड त्याचा खिशातच राहिला व मग त्याने तो कसा मोहितेचा घरी टाकला, मग जेव्हा तो बाहेर येत होता तेव्हा त्याला ठाऊक होतं कि उठे मनी

आपल्याला जाऊ देणार नाही सर्व घरच्यांना जागं करीन व त्यासाठी त्याने मनीच्या मागून जाऊन मनीवर चाकूने वार केला या पूर्ण गोष्टी त्याने मानल्या व बाबाची व आईंची माफी सुद्धा मागितली. पण त्यांना कोनीच माफ करेना शेवटी मग मिस्टर शिंगाणकर व मिसेसशिंगाणकरयांना इन्स्पेक्टर अंकल यांनी जेलमध्ये टाकलं.

मनीच्या हत्यारांना शिक्षा तर मिळाली होती पण मात्र ती आमच्या आयुष्यातून मात्र निघून गेली होती. तिची आठवण होती मात्र ती नव्हती. तिचे अस्तित्व नव्हते, खरंच मानवाबरोबर झालेले प्रेम विसरायचे म्हटलं कि विसरतोही माणूस पण एका मुक्या जनावराच्या प्रेमात पडलो तर ते कसं विसरायच. मी इन्स्पेक्टर अंकल चा खूप खूप आभारी आहे, त्यांनी आम्हाला खरा गुन्हेगार शोधण्यास मदत केली.

***------------- धन्यवाद ------------***

# अभिप्राय

नमस्कार मित्रानो कशी वाटली ही कथा, मनाने सांगा होती ना, तर मग अश्याच काही कथा परत वाचायला पाहिजे का तर मग नक्की प्रतिसाद म्हणून आम्हाला इमेल करा. किंवा माझा फेसबुक पेज लाईक करा. किंवा मला एक एस एम एस करा, मला WhatWWhatsApp करा.

मला मोबाइलवर संदेश पाठवा

**7875496807**

मला WhatWWhatsApp करा

**9665752481**

मला इमेल करा

**krathod787@gmail. com**

फेसबुकवर लाईक करा

**www. facebook. com/krishnarathod787**

फेसबुक वर मित्र बनवा

www. facebbok. com/knrathod2

ओनलाईन कविता, कथा वाचा

**1.www. krushnarathod. wordpress. com**

**2.www. esahity. com**